माहितीचा
अधिकार

# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर
## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : ८७२/२०२२**

अपिलार्थी—श्री. उमेश गोंडू भारशंकर

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी,**
**नगर पंचायत कार्यालय, अहेरी, ता. अहेरी,जि. गडचिरोली**

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,**
**नगर पंचायत कार्यालय, अहेरी, ता. अहेरी, जि. गडचिरोली**

**व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०६.०५.२०२४**

| | | |
|---|---|---|
| अपीलकर्ता | : | अनुपस्थित |
| जन माहिती अधिकारी | : | उपस्थित |
| प्रथम अपिलीय अधिकारी | : | उपस्थित |

| मूळ अर्जाचा दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपीलाचा दिनांक | प्रथम अपीलीय प्राधीकाऱ्याच्या निर्णयाचा / आदेशाचा दिनांक |
|---|---|---|---|
| ०२.०८.२०२१ | निरंक | १५.०९.२०२१ | २०.०९.२०२१ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दि.०२.०८.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी "नगर पंचायत, अहेरी कार्यालयाच्या वतीने सन २०२०-२०२१ मध्ये जमा खर्चाच्या ज्या ज्या नोंदी घेण्यात आल्या त्या नोंदीच्या छायांकित प्रती मिळणेबाबत", माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी विहीत मुदतीत कुठलाच प्रतिसाद दिल्याचे दिसून येत नाही. तदनंतर अपिलार्थी यांनी **दि. १५.०९.२०२१** रोजी कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे "माहिती पुरविली नाही" असे कारण नमूद करून प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २०.०९.२०२१ रोजी सुनावणी घेऊन, "अपिलार्थी यांनी प्रस्तुत प्रकरणामध्ये जमा खर्चाचे (कॅशबुक) नोंदीची माहिती मिळणेबाबत एकूण १ मुद्द्यांमध्ये माहिती मागितली होती. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(६) नुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना सदर माहिती नि:शुल्क प्रदान करावी. तसेच अपिलाच्या वेळी अर्जदाराने मागितलेली इतर माहिती देखील देण्यात यावी. याच सोबत माहिती उपलब्ध नसल्यास मुद्देनिहाय अपिलार्थीस तसे लेखी कळवावे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी सदर अर्जातील माहिती हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ०७

(सात) दिवसांच्या मुदतीत अपिलार्थीस द्यावी व त्यासंबंधीचा अनुपालन अहवाल प्रथम अपिलीय अधिकारी यांना सादर करावा", असे आदेशित करून अपील निकाली काढले आहे.

त्यानंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे दि. २२.०३.२०२२ रोजी "माहिती न पुरविल्यामुळे" असे कारण नमूद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर द्वितीय अपील अर्ज आयोग कार्यालयास दि. २४.०३.२०२२ रोजी प्राप्त झाला आहे. त्यावर आज दि. ०६.०५.२०२४ रोजी ऑनलाईन पध्दतीने सुनावणी आयोजित करण्यात आली असून सुनावणी दरम्यान अपिलार्थी अनुपस्थित आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी, नगर पंचायत कार्यालय, अहेरी, ता. अहेरी, जि. गडचिरोली, श्री. मोटघरे ऑनलाईन पध्दतीने उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर पंचायत कार्यालय, अहेरी, ता. अहेरी, जि. गडचिरोली, श्री. नाना दाते ऑनलाईन पध्दतीने उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास आले की, अपिलार्थी श्री. भारशंकर यांनी दिनांक ०२.०८.२०२१ रोजी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांचेकडून विहित मुदतीत माहिती प्रदान न केल्यामुळे दिनांक १५.०९.२०२१ रोजी प्रथम अपील अर्ज दाखल केला आहे. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २०.०९.२०२१ रोजी सुनावणी घेऊन, "माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ७(६) नुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना सदर माहिती नि:शुल्क प्रदान करावी. तसेच अपिलाच्या वेळी अर्जदाराने मागितलेली इतर माहिती देखील देण्यात यावी. याच सोबत माहिती उपलब्ध नसल्यास मुद्देनिहाय अपिलार्थीस तसे लेखी कळवावे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी सदर अर्जातील माहिती हे आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून ०७ (सात) दिवसांच्या मुदतीत अपिलार्थीस द्यावी व त्यासंबंधीचा अनुपालन अहवाल प्रथम अपिलीय अधिकारी यांना सादर करावा", असे आदेशित करून अपील निकाली काढले आहे. सदर प्रकरणी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या स्तरावर सकारात्मक आदेश पारीत केले आहे. त्यानुसार विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक २०.०९.२०२१ रोजीच्या आदेशाचे तात्काळ अनुपालन करण्याच्या निर्देशासह प्रस्तूत व्दितीय अपील अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

**उपरोक्त आदेशानुसार अपील निकाली काढण्यात येत आहे.**

(राहुल भा. पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर
सत्यमेव जयते

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : ०६.०५.२०२४**

26 AUG 2024

जावक क्रमांक ३४०६ ---- दिनांक ----------------------